**प्रारंभिक अधिसूचना**

क्रमांक-कावि/भू.सं./इवद/क.लि./900/2016
शाखा : भूसंपादन (इमारत व दळणवळण)
जिल्हाधिकारी कार्यालय, बुलडाणा
दिनांक :- 20/10/2016

**भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम-२०१३ अन्वये कलम ११(१) खालील अधिसूचना.**

ज्याअर्थी, भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम,२०१३ (३० चा २०१३) च्या कलम ३ च्या खंड (इ) च्या परंतुकाव्दारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करुन काढण्यात आलेली शासकिय अधिसुचना, महसुल व वनविभाग क्रमांक-संकीर्ण११/२०१४/प्र.क्र.७७/अ-२, दिनांक १९ जानेवारी,२०१५ (यात यापुढे जिचा निर्देश "उक्त अधिसुचना" असा करण्यात आला आहे) याव्दारे असे अधिसुचित केले आहे की, उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड (झेड अे) मध्ये व्याख्या केलेल्या एखाद्या सार्वजनिक प्रयोजनासाठी, एखाद्या जिल्हयातील ५०० हेक्टरपेक्षा अधिक नसेल इतक्या क्षेत्राकरीता जमीन संपादन करण्याचा संबंधात, अशा जिल्हयाचा जिल्हाधिकारी हा उक्त अधिनियमाच्या प्रयोजनासाठी समुचित शासन असल्याचे मानण्यात येईल;

आणि ज्याअर्थी, उक्त अधिसूचनेनुसार समुचित शासन असलेल्या बुलडाणा जिल्हयाच्या जिल्हाधिकाऱ्यास यासोबत जोडलेल्या अनुसूची एक मध्ये अधिक तपशिलवार वर्णन केलेली जमीन (यात यापुढे जिचा निर्देश "उक्त जमीन" असा करण्यात आला आहे) सार्वजनिक प्रयोजनासाठी (यात यापुढे ज्याचा निर्देश उक्त "सार्वजनिक प्रयोजन" असा करण्यात आला आहे) आवश्यक आहे अथवा तिची आवश्यकता भासण्याची शक्यता आहे, असे वाटते, ज्याच्या स्वरुपाचे विवरण यासोबत जोडलेल्या अनुसुची दोनमध्ये दिलेले आहे, आणि म्हणून उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोट कलम (१) च्या तरतुदीन्वये याव्दारे असे अधिसूचित करण्यात येते की, उक्त जमिनीची उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता भासण्याची शक्यता आहे;

आणि ज्याअर्थी, प्रस्तावित भूमि संपादनाच्या अनुषंगाने बाधित व्यक्तींचे विस्थापन करण्यास भाग पाडणारी कारणे, यासोबत जोडलेल्या अनुसूची तीन मध्ये दिलेली आहेत.

आणि ज्याअर्थी, कलम ४३ च्या पोट कलम (१) अन्वये पुनर्वसन व पुनर्स्थापना या प्रयोजनासाठी नियुक्त केलेल्या प्रशासकाचा तपशील, यासोबत जोडलेल्या अनुसूची पाचमध्ये दिलेला आहे.

त्याअर्थी आता, असे घोषित करण्यात येत आहे की, उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोट कलम ४ अनुसार कोणतीही व्यक्ती, ही अधिसूचना प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासून ते उक्त अधिनियमाच्या प्रकरण चार खालील कार्यवाही पूर्ण होईल त्या कालावधीपर्यंत उक्त जमीनीचा अथवा तिच्या भागाचा कोणताही व्यवहार करणार नाही किंवा उक्त जमिनिवर कोणताही भार निर्माण करणार नाही;

परंतु, उक्त जमिनीच्या अथवा तिच्या भागाच्या मालकाने अर्ज केल्यावर, जिल्हाधिकाऱ्यास विशेष परिस्थितीची कारणे लेखी नमूद करुन अशा मालकास उपरोक्त तरतूदीच्या प्रवर्तनातून सूट देता येईल;

परंतु आणखी असे की, जर कोणत्याही व्यक्तीने या तरतूदीचे बुध्दीपुरस्पर उल्लंघन केल्यामुळे तिला झालेल्या कोणत्याही हानीची किंवा क्षतीची जिल्हाधिकाऱ्यांकडून भरपाई दिली जाणार नाही.

तसेच, उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोट कलम (५) अनुसार, जिल्हाधिकारी भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना उचित भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क (महाराष्ट्र) नियम, २०१४ (यात यापुढे ज्यांचा निर्देश "उक्त नियम" असा करण्यात आला आहे) यांच्या नियम १० च्या उपनियम (३) व्दारे विहित केल्याप्रमाणे भूमिअभिलेखाच्या अद्ययावतीकरणाचे काम हाती घेणार असल्याचे व पूर्ण करणार असल्याचे देखील घोषित करण्यात येत आहे.

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड (छ) अन्वये, समुचित शासन असलेला जिल्हाधिकारी, उक्त अधिनियमाखालील जिल्हाधिकाऱ्यांची कार्ये पार पाडण्यासाठी उपजिल्हाधिकारी (भूसंपादन) (इमारत व दळणवळण) बुलडाणा, जिल्हाधिकारी कार्यालय बुलडाणा. यास पदनिर्देशित करीत आहे.

## अनुसूची - १

## जमिनीचे वर्णन

**गाव : जिगांव** **तालूका : नांदुरा** **जिल्हा : बुलडाणा**

| **अनुक्रमांक** | **भूमापन क्रमांक** | **एकूण क्षेत्र (हे.आर)** |
|---|---|---|
| 1 | 29 | 0.41 |
| 2 | 384 | 0.58 |
| 3 | 387 | 0.61 |
| एकुण | | 1.60 हे.आर |

**भूसंपादनाचे प्रयोजन** :- जिगांव प्रकल्पाचे धरण बैठक, बुडीत क्षेत्र, रस्ते व खदानी इत्यादीचे कामाकरीता लागणा-या मौजे जिगांव ता. नांदुरा येथील खाजगी जमीनीचा भूसंपादन प्रस्ताव 1.60 हे.आर.

## अनुसूची - २

### सार्वजनिक प्रयोजनाच्या स्वरुपाबाबत विवरण

**प्रकल्पाचे नांव** - जिगांव प्रकल्प

**प्रकल्पकार्याचे वर्णन** - जिगांव प्रकल्पाचे धरण बैठक, बुडीत क्षेत्र, रस्ते व खदानी इत्यादीचे कामाकरीता.

**समाजाला मिळणारे लाभ -**

या प्रकल्पामुळे शेतीसाठी पाणी, सार्वजनिक पाणीपुरवठा, उद्योगधंद्यांना पाणीपुरवठा होणार आहे. त्याचबरोबर ग्रामीण भागामध्ये रोजगार निर्मिती होणार असून ग्रामीण भागातील कष्टकरी, शेतकरी, भूमीहीन शेतमजूर यांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होणार असून त्यांच्या जीवनमानात (STANDARD OF LIVING) सुधारणा होणार आहे.

## अनुसूची - ३

**बाधित व्यक्तींचे विस्थापन करण्यास भाग पाडणारी कारणे :-**

सदर संपादीत क्षेत्र हे शेतजमीनीचे असल्यामुळे बाधीत व्यक्तींचे विस्थापन होत नाही व पुनर्वसन करण्याचा प्रश्नच उदभवत नाही.

## अनुसूची - ४

**सामाजिक परीणाम निर्धारणाचा सारांश :-**

जिगांव प्रकल्पाला पर्यावरण मान्यता मिळालेली असल्यामुळे सामाजिक परिणाम निर्धारणातून सुट आहे.

## अनुसूची - ५

### नियुक्त केलेल्या प्रशासकाचा तपशील

अ) या प्रकल्पामुळे शेतीसाठी पाणी, सार्वजनिक पाणीपुरवठा, उद्योगधंद्यांना पाणीपुरवठा होणार आहे. त्याचबरोबर ग्रामीण भागामध्ये रोजगार निर्मिती होणार असून ग्रामीण भागातील कष्टकरी, शेतकरी, भूमीहीन शेतमजूर यांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होणार असल्यामुळे भूसंपादनास शेतक-यांची संमती आहे. तसेच सदरचा प्रकल्प् अनुशेष ग्रस्त् जिल्हयातील दुष्काळ प्रवण भागातील आहे. सदर क्षेत्र हे शेतजमीनीचे असल्यामुळे पुनर्वसन करण्याची आवश्यकता नाही. सबब प्रशासक नियुक्तीचा प्रश्न उद्भवत नाही.

ब) **प्रशासनाच्या कार्यालयाचा पत्ता** **:-** निरंक

ख) **ज्या अधिसूचनेव्दारे प्रशासकाची** **:-** निरंक
**नियुक्ती करण्यात आली आहे त्या**
**अधिसूचनेचा तपशिल**

**टिप :-** उक्त जमिनीच्या आराखड्याचे उपजिल्हाधिकारी भूसंपादन(इ.व.द.) जिल्हाधिकारी कार्यालय बुलडाणा कार्यालयामध्ये निरीक्षण करता येईल.

दिनांक : / /2016

ठिकाण : बुलडाणा.

(डॉ.विजय झाडे भा.प्र.से.)

जिल्हाधिकारी, बुलडाणा.